डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २४ /२०२६ दि. २२ /०१/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत श्री. राजन आभाळे. व्यवस्थापक के. एस. आर. फिल्म प्रोडक्शन यांचेवतीने मराठी चित्रपट **" पालखी "** चे चित्रिकरण दिनांक २३/०१/२०२६ रोजी पहाटे ०५:०० ते दुपारी १३:०० वाजेपावेतो डोंबिवली पुर्व येथील जलाराम आशिष बिल्डींगजवळ नेहरू रोड ते आप्पा दातार चौक ते बाबासाहेब जोशी पथ क्रॉस रोड/गुलशन ज्युस, फडके रोड डोंबिवली पुर्व या परिसरात करण्यात येणार आहे. सदर चित्रिकरणास डोंबिवली येथील पुर्व फडके रोड व नेहरू रोड येथे वाहतुक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** ठाकुर्ली ब्रिजवरून ब्लॉसम शाळामार्गे नेहरू रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **''ब्लॉसम शाळा''** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने डावे वळण घेवुन सरदार वल्लभभाई पटेल रोड/व्ही. पी. रोडमार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तुळशी स्विट कॉर्नर, छेडा क्रॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडकडे येणारी वाहने सरळ येवुन **टिळक रोडने मदन ठाकरे चौक** रोडमार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** मदन ठाकरे चौक, टिळक क्रास रोडने नेहरू रोड मार्गे ब्लॉसम शाळा ठाकुर्ली ब्रिजकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मदन ठाकरे चौक फडके रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने टिळक रोड मार्गे मुखर्जी रोड, सावरकर रोड, व्ही.पी.रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग	फडके रोडवरील आप्पा दातार चौक ते मदन ठाकरे चौक दरम्यान रस्ता **''नो पार्किंग''** करण्यात येत आहे.
पर्यायी पार्किंग	सदर रोडवरील वाहनचालकांना मदन ठाकरे चौक ते अंबिका हॉटेल कॉर्नर दरम्यान पी १, पी २ पार्किंग उपलब्ध आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २३/०१/२०२६ रोजी पहाटे ०५:०० वा. पासुन ते दुपारी १३:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीस्तव,

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.